प्रेसनोट

जळगाव जिल्हापोलीस
दि.13/05/2025

दै.-----------संपादकसो,
जळगाव.

विषय :- **संघटीत गुन्हे करणारे घरफोडीतील आरोपी एम.आय.डी.सी पोलीसांनी केले जेरबंद**

जळगाव जिल्हयामध्ये चोरीच्या घटनावाढत असल्यामुळे मा. पोलीस अधीक्षक श्री महेश्वर रेड्डी सो, मा अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते सो, यांनी चोरीच्या घटना उघडकिस आणुन आरोपी अटक करणे बाबत मार्गदर्शन केले होते.त्याप्रमाणे मा उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत सो, पोलीस निरीक्षक संदीप पाटील सो, यांनी गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना चोरीचे गुन्हे उघडकिस आणण्याच्या सुचना केल्या होत्या.

एम.आय.डी.सी परीसरातील जगवानीनगरच्या गेटसमोर दुकान नं 04.00 चे शटर उचकावुन चैनल गेटकट करुन त्यावाटे आत प्रवेश करुन1)65000/-रू किंमती च्या जुने स्क्रॅप कॉपर एकुण सहा गोण्या अंदाजे 350 किलो.कि अं.2)1,20,000/-रू किं चे नविन कॉपरचे अंदाजे 150 किलो वजनाच्या वायरी किअं.असा एकुण 1,85,000/- रु. कि.चा मुददेमाल चोरी झाल्याचे फिर्यादीवरुन एम.आय.डी.सी पो.स्टे येथे गु.र.न 302/2025 BNS कलम 305(अ),331(3),331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

गुन्हा दाखल झाल्यावर पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार यांना सदर भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासुन गुन्हा उघडकिस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या, त्या नुसार गुन्हे शोध पथकातील पोलीस पथकातील पो.शि.राहुल घेटे यांना मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे रितेश संतोष आसेरी वय- 46 रा. पंचमुखी हनुमान मंदीरामागे रणछोडदास नगर जळगांव याला त्याचे राहते घरातुन सापळा रचुन ताब्यात घेतले असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्याचे सोबत असलेल्या आरोपी रनजीतसिंग जिवनसिंग जुन्नी वय- 32 याला पो.हे.कॉं गणेश शिरसाळे पो.ना प्रदीप चौधरी ,पो.कॉं नितीन ठाकुर ,किरण पाटील ,राकेश बच्छाव यांनी आरोपी यास सापळा रचुन रामानंद नगर पो.स्टे हद्दीतुन त्याचा पाठलाग करीत मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले सदर आरोपी यांनी चोरीस गेलेला मुद्देमाल कोठे विकला याबाबत स्था.गु.शा जळगांव चे पोलीस अंमलदार स.फौ.विजयसिंग पाटील, रवि नरवाळे , अक्रम शेख, यांचे माहीतीवरुन गुन्हयात चोरीस गेलेल्या मुददेमाल हस्तगत करुन सदर आरोपी यांना गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. त्यांची पोलीस कस्टडी रीमांड घेवुन सदर संशईतांकडुन 54,000/रु.कि.100 किलो वजनाचे जुने तसेच नविन तांब्याचे तार हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि राहुल तायडे पोका योगेश घुगे हे करीत आहे.

सदरचा गुन्हा हा मा.पोलीस अधिक्षक श्री.महेश्वर रेड्डी सो, मा अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते सो, मा उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत सो, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोउप निराहुल तायडे, चंद्रकांत धनके, पो.हे.कॉं गणेश शिरसाळे पो.ना प्रदीप चौधरी ,पो.कॉं नितीन ठाकुर ,राहुल घेटे,किरण पाटील ,राकेश बच्छाव, स्था.गु.शा जळगांव चे पोलीस अंमलदार स.फौ.विजयसिंग पाटील, रवि नरवाळे , अक्रम शेख,यांनी उघडकिस आणलेले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव.



एम.आय.डी.सी.
पोलीस स्टेशन जळगाव
फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
नो पार्किंग